आरबीआय/२०११-१२/८९
आयडीएमडी.पीसीबी. ४ /१४.०१.०२/२०११- १२ जुलै १, २०११

अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व शेड्युल बँक, प्राथमिक डीलर
आणि सर्व भारतात वित्तसहाय्य वित्तीय संस्था

महोदय/महोदया

**महापरिपत्रक - वाणिज्यिय कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

कमर्शियल पेपर (सीपी) हा एखाद्या प्रॉमेसरी नोटेच्या स्वरुपात दिला जाणारा वित्तबाजारातील एक संलेख असून भारतात १९९० मध्ये त्याची सुरुवात झाली. त्याचा उद्देश म्हणजे, उच्च रेटिंग असलेल्या कॉर्पोरेट कर्जदारांना त्यांच्या लघुमुदतीच्या कर्ज स्त्रोतांची वैविध्यपूर्ण गुंतवणुक करणे आणि गुंतवणुकदारांना एक अतिरिक्त संलेख उपलब्ध करुन देणे हा आहे..

२. बाजारात घेणारांच्या व इतर संबंधितांच्या संदर्भासाठी, ह्या विषयावरील सर्व विद्यमान मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश समाविष्ट करुन एक महापरिपत्रक तयार करण्यात आले हाहे. येथे नोंद घ्यावी की, सीपी देण्याशी संबंधित असलेल्या, आणि जोडपत्रात दिलेल्या परिपत्रकातील सर्व सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्या महापरिपत्रकात अद्यावत व समाविष्ट करण्यात आली आहेत. हे महापरिपत्रक रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही www.mastercirculars.rbi.org.in. टाकण्यात आले आहे.

आपला,

(के.के.वोहरा)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

सह. वरील प्रमाणे;

| | **अनुक्रमणिका** | |
|---|---|---|
| **अनु क्र.** | **प्रकरण** | **पान क्र.** |
| **१** | प्रस्तावना | २ |
| **२** | सीपी देण्यास पात्र | २ |
| **३** | वर्गवारी आवश्यकता | २ |
| **४** | परिपक्वता | ३ |
| **५** | रक्कम | ३ |
| **६** | सीपीची मर्यादा आणि राशी | ३ |
| **७** | देणारा आणि रक्कम भरणारा एजंट (आयपीए) | ३ |
| **८** | सीपीमधील गुंतवणूक | ३-४ |
| **९** | सीपीमधील व्यापार | ४ |
| **१०** | सीपी देण्याची पद्धत | ४ |
| **११** | जमा करण्यासाठी प्राधान्यक्रम | ४ |
| **१२** | सीपीची रक्कम देणे | ४ |
| **१३** | स्टँड बाय फॅसिलिटी | ५ |
| **१४** | इश्यु करण्यासाठीची प्रक्रिया | ५ |
| **१५** | भुमिका आणि जवाबदारी | ५ |
| **१६** | कागदपत्रे प्रक्रिया | ७ |
| **१७** | सीपी बाजारपेठेतील कसूर | ७ |
| **१८** | अन्य काही निर्देश लागू नसण्याची स्थिती | ७ |
| **१९** | व्याख्या | ८ |
| | शेड्युल | |
| | शेड्युल I | ९-१० |
| | शेड्युल II | ११ |
| | शेड्युल III | १२-१३-१४ |
| | जोडपत्र | |
| | I. सीपीच्या परतफेडीबाबतच्या कर्सुरींची सविस्तार माहिती | १५ |
| | II. व्याख्या | १६-१७ |
| | परिशिष्टः परिपत्रकाची यादी | १८-१९ |

## १. प्रस्तावना

वाणिज्यिय कागदपत्र (सीपी) हे वचनपत्राच्या स्वरूपात देण्यात येणारे बाजारपेठेतील एक असुरक्षित आर्थिक दस्तऐवज आहे. अत्यंत उच्च नामांकन असलेल्या कॉर्पोरेट कर्जदारांना त्यांच्या अल्प मुदतीच्या कर्जाचे स्रोत वेगवेगळ्या प्रकारे दर्शवता यावेत आणि गुंतवणूकदारांना आणखी साधन मिळावे, ह्यासाठी भारतामध्ये १९९० मध्ये वाणिज्यिय कागदपत्र म्हणजेच सीपी खाजगी दस्तऐवज (साधन) म्हणून आणले आले. त्यानुसार, प्राथमिक वितरक (पीडीज) आणि अखिल भारतीय वित्तासंस्थांनाही त्यांच्या अल्प मुदतीच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सीपी देण्याची अनुमती देण्यात आली. तत्काळ संदर्भ घेता यावा, ह्यासाठी सीपी देण्याच्या मार्गदर्शक सूचना अद्ययावत सुधारणांसह पुढे दिलेल्या आहेत.

## २. सीपी देण्यास पात्र संस्था

२.१ कॉर्पोरेट कंपन्या, प्राथमिक वितरक म्हणजे पीडीज आणि भारतीय रिजर्व बँकेद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या कमाल मर्यादेत (अम्ब्रेला लिमिट) (जिची व्याख्या खालील परिच्छेद ६.२ मध्ये करण्यात आलेली आहे) अल्पकालीन संसाधने उभी करण्याची अनुमती असलेल्या अखिल भारतीय आर्थिक संस्था (एफआय) ह्या सीपी देण्यासाठी पात्र आहेत.

२.२ पुढील अटीनुसार कॉर्पोरेट कंपनी सीपी देण्यासाठी पात्र असेलः

अ. लेखापरीक्षण केलेल्या शेवटच्या ताळेबंदानुसार कंपनीकडे असलेली निव्वळ मालमत्ता रूपये चार कोटीपेक्षा कमी नसली पाहिजे;

ब.बँका किंवा आर्थिक संस्थांद्वारे कंपनीच्या कामकाजासाठी भांडवल मर्यादा प्रमाणित केली गेलेली असली पाहिजे आणि पुरवठा करणा-या आर्थिक संस्था/ बंक ह्यांच्याद्वारे कंपनीच्या कर्ज घेण्यात येणा-या खात्यास प्रमाण साधन (स्टँडर्ड ॲसेट) म्हणून बघितले जात असले पाहिजे.

## ३. वर्गवारी आवश्यकता/मानांकनासाठीची आवश्यकता

सर्व पात्र सहभागी संस्था पुढीलपैकी कोणत्याही कर्ज मानांकन संस्थेकडून (सीआरएज) सीपी मिळण्यासाठी कर्ज मानांकन प्राप्त करतीलः क्रेडिट रेटिंग इन्फॉर्मेशन सर्विसेस ऑफ इंडिया लि. (सीआरआयएसआयएल), इन्वेस्टमेंट इन्फॉर्मेशन अँड क्रेडिट रेटिंग एजन्सी ऑफ इंडिया लि. (आयसीआरए), कर्ज विश्लेषण आणि संशोधन (सीएआरई), एफआयटीसीएच रेटिंग इंडिया प्रा. लि. आणि आरबीआयद्वारे वेळोवेळी ह्या उद्देशासाठी घोषित करण्यात येणा-या अन्य कर्ज नामांकन संस्था. किमान कर्ज नामांकन सीआरआयएसएलचे पी-२ किंवा त्याप्रमाणे अन्य कर्ज नामांकन संस्थेद्वारे दिले जाणारे नामांकन असेल. देण्यात येणारे नामांकन सधयाच्या काळातील असून त्याची समीक्षा करण्याची आवश्यकता नाही, हे नामांकन देणा-या संस्थेचे नामांकन देण्याच्या वेळेस असलेले दायित्व आहे.

**४. परिपक्वता**

देण्यात येण्यापासून किमान ७ दिवस आणि कमाल एक वर्ष ह्या कालावधीतील पूर्ण होण्याच्या कालावधीसाठी सीपी दिली जाऊ शकेल. ती देणा-या संस्थेचे कर्ज नामांकन वैध असण्याच्या कालमर्यादेपर्यंतच सीपी पूर्ण होण्याचा कालावधी असला पाहिजे.

**५. रक्कम**

सीपी रूपये पाच लाख किंवा त्यांच्या पटीमध्ये देता येऊ शकेल. एका गुंतवणूकदाराने गुंतवलेली रक्कम रूपये पाच लाख (प्राथमिक किंमत) पेक्षा कमी असू नये.

**६. सीपीची मर्यादा आणि राशी**

६.१ सीपी 'एकमेव घटक' वस्तु म्हणून दिली जाऊ शकते. देण्यात येणा-याद्वारे दिली जाणारी सीपीची एकूण रक्कम त्याच्या संचालक मंडळाद्वारे प्रमाणित केलेली मर्यादा किंवा निर्धारित नामांकनासाठी सीआरएद्वारे सूचित करण्यात आलेली मर्यादा ह्यांपैकी जे कमी असेल, त्याहून कमी असली पाहिजे. तरीसुद्धा बँका आणि वित्तासंस्थांना सीपीसह कंपनीच्या आर्थिक संसाधन परिस्थितीला विचारात घेऊन कामकाजाच्या भांडवलाच्या मर्यादा निश्चित करण्याची संधी उपलब्ध आहे.

६.२ डीबीओडीद्वारे देण्यात आलेल्या आणि वेळोवेळी अद्ययावत करण्यात आलेल्या संसाधने उभी करण्याच्या नियामांनुसार महापरिपत्रकामध्ये नमूद केलेल्या सर्वसाधारण कमाल मर्यादेमध्ये वित्तासंस्था सीपी देऊ शकतील.

६.३ देण्यात येण्याचे प्रस्तावित असलेल्या सीपीची एकूण रक्कम देणा-याने द्यायचे घोषित केल्यापासून दोन आठवड्यांच्या आत उभी केली गेली पाहिजे. जेव्हा एक तारीख दिली गेली असेल किंवा वेगवेगळ्या ठिकाणी भिन्न तारखा दिल्या गेल्या असतील, तेव्हा भिन्न तारखांच्या संदर्भात प्रत्येक सीपीचा पूर्तता दिनांक एकच असेल.

६.४ अद्ययावत नूतणीकरण करण्यात आलेल्या इश्युसह प्रत्येक इश्यु नवीन समजण्यात यावा.

**७. देणारा आणि रक्कम भरणारा एजंट (आयपीए)**

सीपी देण्यासाठी आयपीए म्हणून फक्त अनुसूचित बँकच काम करू शकते.

**८. सीपीमधील गुंतवणूक**

व्यक्ती, बँक कंपन्या, अन्य कॉर्पोरेट कंपन्या (ज्या भारतामध्ये नोंदणीकृत असतील किंवा सहभागी असतील) आणि कॉर्पोरेट नसलेल्या कंपन्या, अनिवासी भारतीय आणि परकीय संस्थागत गुंतवणूकदार (एफआयआय) सीपी देऊ शकतात आणि घेऊ शकतात. तरीसुद्धा, परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांची गुंतवणूक भारतीय सुरक्षा आणि विनिमय मंडळाद्वारे (सेबी) निर्धारित केलेल्या मर्यादेत असेल.

**९. सीपीमधील व्यापार**

सीपीमधील सर्व ओटीसी व्यापारी स्थिर उत्पन्न आर्थिक बाजारपेठेमध्ये (Fixed Income Money Market) आणि डेरिवेटिव्ह असोशिएशन ऑफ इंडियाच्या (एफआयएमएमडीए) सूचना स्थानावर व्यापार केल्यानंतर पंधरा मिनिटांच्या आत व्यापाराबद्दल सूचित करतील.

**१०. सीपी देण्याची पद्धत**

१०. १ वचनपत्राच्या (अनुसूची १) स्वरूपात सीपी दिली जाऊ शकेल किंवा सेबीद्वारे प्रमाणित आणि नोंदणीकृत असलेल्या कोणत्याही डिपॉझिटरीमध्ये ती जमा करता येऊ शकेल.

१०.२ सीपी देणा-याद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथमिक किमतीवर काही सवलतीसह सीपी दिली जाऊ शकेल.

१०.३ सीपी देणारी कोणतीही संस्था सीपीची हमी देऊ शकणार नाही किंवा तिचा एक भागीदार म्हणून स्वीकार करू शकणार नाही.

**११. जमा करण्यासाठी प्राधान्यक्रम**

सीपी देणे किंवा ती प्रत्यक्ष किंवा जमा केलेल्या स्वरूपात ठेवणे हे पर्याय सीपी देणा-यास व घेणा-यांस उपलब्ध आहेत, परंतु सीपी घेणा-यांनी व देणा-यांनी ती देण्यासाठी/ ठेवण्यासाठी जमा करण्याचा पर्याय स्वीकारणे अधिक योग्य आहे. तरीसुद्धा, ३० जून २०११ पासून बँका, वित्तासंस्था आणि पीडीज ह्यांना नवीन गुंतवणूक करून सीपी फक्त जमा केलेल्या स्वरूपातच ठेवणे आवश्यक झाले आहे.

**१२. सीपीची रक्कम देणे**

सीपीचे सुरुवातीचे गुंतवणूकदार आयपीएद्वारे सीपी देणा-याच्या खात्यामध्ये खात्यावर जमा होणा-या (क्रॉस अकाउंट पेयी) धनादेशाद्वारे सीपीची सवलतीसह असलेली रक्कम भरतील. सीपीचा कालावधी पूर्ण झाल्यावर जर सीपी प्रत्यक्षात घेतलेली असेल, तर सीपीचा धारक आयपीएद्वारे सीपी देणा-यास रक्कम जमा करण्याचा दस्तऐवज देईल. परंतु जर सीपी डिमॅट स्वरूपात घेतली गेली असेल, तर सीपी धारकास ती डिपोझिटरीद्वारे रोख रकमेच्या स्वरूपात घ्यावी लागेल आणि आयपीएद्वारे रक्कम प्राप्त करावी लागेल.

## १३. स्थगन सुविधा (स्टँड बाय फॅसिलिटी)

१३.१ सीपी जर 'एकमेव घेतलेली' वस्तु असेल, तर बँक आणि वित्तासंस्थांवर सीपी देणा-यास स्थगन सुविधा देणे कोणत्याही प्रकारे बंधनकारक असणार नाही. परंतु बँका आणि वित्तासंस्थांना त्यांच्या वाणिज्यिय निर्णयाप्रमाणे लागू असलेल्या महत्तवाच्या नियमांनुसार आणि संबंधित मंडळांच्या विशिष्ट मान्यतेसह सीपी देण्यामध्ये, स्थगन सहाय्य/ कर्ज, बॅक स्टॉप सुविधा इत्यादिनुसार कर्ज वाढवण्याची मोकळीक देण्यात आली आहे.

१३.२ (कॉर्पोरेटससह) बँक नसलेल्या यंत्रणासुद्धा दिलेल्या सीपीसाठी विनाअट आणि अपरिवर्तनीय हमीसह कर्जामध्ये वाढ करू शकतील.

i. सीपी देण्यासाठी पात्रतेचे निकष सीपी देणारी यंत्रणा पूर्ण करेल;

ii. सीपी देणा-यापेक्षा प्रमाणित सीआरएद्वारे देण्यात आलेले कमीत कमी एक गुण अधिक असे नामांकन हमीदारास प्राप्त असेल; आणि

iii. सीपी प्रस्ताव कागदपत्रामध्ये हमीदार कंपनीच्या निव्वळ किमतीला उघड केले असेल, हमीदाराने ज्या कंपन्यांना आजपर्यंत अशी हमी दिलेली असेल, त्यांची नावे व त्यांना हमीदार कंपनीद्वारे दिलेल्या हमीचे स्वरूप व प्रमाण आणि त्या हमी देण्यातील अटी योग्य प्रकारे उघड केल्या जातील.

## १४. इश्यु करण्यासाठीची प्रक्रिया

इश्यु करणारी प्रत्येक कंपनी सीपी देण्यासाठी आवश्यक प्रकारे एक आयपीएची नियुक्ती करेल. इश्यु करणा-या कंपनीने तिच्या संभाव्य गुंतवणूकदारांना प्रमाणित बाजारपेठेतील परिस्थितीनुसार तिची आर्थिक परिस्थिती उघड करावी. गुंतवणूकदार आणि इश्यु करणारा ह्यांच्यातील कराराची निश्चिती झाल्यानंतर इश्यु करणा-या कंपनीद्वारे गुंतवणूकदारास प्रत्यक्ष प्रमाणपत्रे दिली पाहिजेत किंवा सीपी गुंतवणूकदाराच्या खात्यामध्ये जमा करण्याची व्यवस्था केली पाहिजे. इश्यु करणा-या कंपनीने आयपीएसह वैध करार केलेला असून सर्व कागदपत्रे व्यवस्थित आहेत, ह्या आशयाच्या आयपीए प्रमाणपत्राची एक प्रत गुंतवणूकदारांना दिली जाईल (अनुसूची २)

## १५. भूमिका आणि जवाबदारी

इश्यु करणारी कंपनी, आयपीए आणि सीआरए ह्यांच्या भुमिका व जवाबदा-या पुढीलप्रमाणे असतील.

**i. इश्यु करणारी कंपनी**

सीपी देण्याची प्रक्रिया सुलभ झाल्यामुळे आता इश्यु देणा-या कंपन्यांना अधिक लवचिकता मिळाली आहे. तरीसुद्धा, सीपी देण्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व कार्यप्रणालीचे कठोर पालन करण्याची खात्री करणे त्यांच्यासाठी अनिवार्य आहे.

**महापरिपत्रक- वाणिज्यिय कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शक सूचना - जुलै १,२०११**

## (b) ii. इश्यु करणारा आणि रक्कम देणारा एजंट (आयपीए)

i. आरबीआयद्वारे निर्धारित करण्यात आलेले किमान कर्ज नामांकन इश्यु करणा-या कंपनीस प्राप्त आहे आणि सीपी देण्यामधून दिली जाणारी रक्कम सीआरएद्वारे विशिष्ट नामांकनासाठी किंवा त्यांच्या संचालक मंडळाने मान्य केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे, ह्याची खात्री करण्याची जवाबदारी आयपीएवर असेल.

ii. इश्यु देणा-या कंपनीद्वारे देण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचे परीक्षण आयपीए करेल. त्यामध्ये संचालक ठरावाची प्रत, अधिकृत पात्र व्यक्तींची स्वाक्षरी (जेव्हा सीपी प्रत्यक्ष स्वरूपात असेल) आणि कागदपत्रे योग्य आहेत, अशा आशयाचे प्रमाणपत्र देणे ह्यांचा समावेश असेल. तसेच, आयपीए ते इश्यु देणा-या कंपनीसह करण्यात येणारे वैध करारपत्र आहे, असेही प्रमाणित करेल (अनुसूची २).

iii.मूळ कागदपत्रांच्या आयपीएद्वारे तपासल्या गेलेल्या प्रमाणित प्रती आयपीच्या ताब्यात ठेवण्यात येतील.

iv. आयपीएज म्हणून काम करणा-या सर्व अनुसूचित बँका इश्यु देण्यात आल्यानंतर तीन दिवसांमध्ये सीपी देण्याबद्दल तपशील देतील व ते तपशील अनुसूची ३ नुसार प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, वित्तसहाय्य बाजार विभाग खाते, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.फॅक्स-०२२-२२६३०९८१/२२६३४८२४, ह्यांना दिले जातील.

v. एनडीएस सदस्य असलेल्या आयपीएजनी सीपी देण्याबद्दलचे तपशील इश्यु पूर्ण झाल्यानंतर दोन दिवसांच्या आत एनडीएस पातळीवर देणे आवश्यक राहील.

vi. तसेच, आयपीएज म्हणून कार्यरत असलेल्या सर्व अनुसूचित बँकांनी सीपी देण्याबद्दलची माहिती ऑनलाईन रिटर्न्स फिलिंग सिस्टीम (ओआरएफएस) मॉड्युलवर सीपी देण्यात आल्यानंतर दोन दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक आहे. एनडीएस पातळीवरील माहितीव्यतिरिक्त ही माहिती देणे वेगळे असून ओआरएफएस मॉड्युल स्थिर होईपर्यंत ती देणे आवश्यक आहे व त्यानंतर एनडीएसवर माहिती देणे थांबवता येऊ शकेल. ह्या संदर्भात आयपीएजना स्वतंत्र प्रकारे सल्ला देण्यात येईल.

**(c) vii. सीआरए**

i. भांडवल बाजारपेठ दस्तऐवज घेण्यासाठीच्या नामांकनासाठी सेबीद्वारे सीआरएजवर लागू केलेली आचारसंहिता सीपीच्या नामांकनासाठी सीआरएजवर लागू असेल.

ii. इथून पुढे इश्यु देणा-या कंपनीच्या सक्षमतेबद्दल असलेल्या आकलनानुसार सीआरएज नामांकनाच्या वैधतेचा कालावधी त्यांच्या निर्णयानुसार निश्चित करू शकतात. त्यानुसार, नामांकन करताना नामांकन कधीपर्यंत लागू राहील, ह्याचा दिनांक त्यांनी स्पष्ट प्रकारे नमूद करणे आवश्यक आहे.

iii. कर्ज नामांकनाच्या वैधता कालावधीचा निर्णय सीआरएज घेऊ शकत असले, तरीही त्यांना ठराविक कालावधीनंतर समोरासमोर इश्यु देणा-या कंपनीच्या कामावर व त्याला देण्यात आलेल्या नामांकनावर लक्ष द्यावे लागेल आणि त्यांच्या प्रकाशनाद्वारे आणि वेबसाईटद्वारे त्यांना त्यांच्या नामांकनामधील बदल सार्वजनिक करणे आवश्यक असेल.

**१६. कागदपत्रे प्रक्रिया**

१६.१ सीपी बाजारपेठमधील कार्य सुरळीत राहावे आणि काम करताना लवचिकता असावी म्हणून, एफआयएमएमडीए आरबीआयसह चर्चेद्वारे सहभागी घटकांद्वारे पालन केले जाण्यासाठी एखादी प्रमाणित प्रक्रिया आणि दस्तऐवज जतन करण्याची प्रक्रिया स्पष्ट करू शकेल, ज्यांचे पालन सर्वोत्ताम आंतरराष्ट्रीय पद्धतीनुसार सहभागी घटकांद्वारे केले जाईल. ह्या संदर्भात एफआयएमएमडीएद्वारे दिनांक ५ जुलै २००१ रोजी जारी करण्यात आलेल्या सविस्तर मार्गदर्शक सूचनांचा संदर्भ इश्यु करणा-या कंपन्या/ आयपीएज घेऊ शकतात.

१६.२ ह्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास दंड होईल आणि त्यामध्ये सीपी बाजारपेठेमधून बाहेर काढण्याचासुद्धा समावेश होऊ शकेल.

**१७. सीपी बाजारपेठेतील कसूर**

सीपीच्या वसूलीमध्ये कसूर होत असल्यास त्यावर लक्ष ठेवण्यासाठी अशी घटना घडल्यास संबंधित सीपीच्या कसूरदाराचे संपूर्ण तपशील आर्थिक बाजारपेठ विभागाकडे जोडपत्र १ मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे तत्काळ देण्याचा सल्ला आयपीएजना दिला जातो.

**१८. अन्य काही निर्देश लागू नसण्याची स्थिती**

जोपर्यंत सीपी देण्याद्वारे रक्कम जमा होण्याची मान्यता ह्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आली असेल, तोपर्यंत सार्वजनिक जमा रकमेसाठी बँकेशिवाय अन्य आर्थिक कंपन्यांची स्वीकृती संबंधित (रिजर्व बँक) निर्देश, १९९८ मध्ये देण्यात आलेली कोणतीही तरतूद बँकांव्यतिरिक्तच्या कोणत्याही वित्त कंपनीवर (एनबीएफसी) लागू होणार नाही.

**१९. ह्या मार्गदर्शक सूचनांमध्ये देण्यात आलेल्या काही विशिष्ट संकल्पनांच्या व्याख्या जोडपत्र २ मध्ये देण्यात आल्या आहेत.**

**महापरिपत्रक- वाणिज्यिय कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शक सूचना - जुलै १,२०११**

**शेड्युल १**
(परिच्छेद १०.१ पहा)

**कमर्शियल पेपरचा (सीपी) नमुना**

ज्या राज्यात द्यावयाचा आहे तेथे जारी असल्यानुसार मुद्रांक लावावेत

(देणाऱ्या कंपनी/संस्थाचे नाव)

अनुक्रमांक

देण्याची जागा :_______________ देण्याची तारीखः_______________

परिपक्वतेची तारीखः_______________ सूट/सवलतीचे दिवस सोडून

(अशा तारखेस सुट्टी असल्यास त्याआधीच्या कामाच्या दिवशी प्रदान केले जावे)

प्राप्त झालेल्या मूल्यासाठी _______________ ही संस्था
(देणाऱ्या कंपनी/संस्थाचे नाव)

_______________ ह्यांना किंवा तिचा आदेश धारक (गुंतवणुकदाराचे नाव) ह्यांना, वर दिलेल्या परिपक्वतेच्या तारखेस, ........... ह्यांना (देणाऱ्या प्रदानकरणाऱ्या एजंटाचे नाव) हा कमर्शियल पेपर सादर किंवा दिल्यावर रु .....(रुपये........) एवढी रक्कम देण्याचे वचन देत आहे._______________

करिता आणि च्या वतीने
(देणाऱ्या कंपनी/संस्थांचे नाव)

| | |
|---|---|
| प्राधिकृत | प्राधिकृत |
| स्वाक्षरीकर्ता | स्वाक्षरीकर्ता |

ह्या कमर्शियल पेपर सर्व सह्या (एंडॉर्समेंट्स) स्वच्छ व स्पष्ट असाव्यात प्रत्येक एंडॉर्समेंट तिच्यासाठी ठेवलेल्या जागीत करावी

ह्यात निर्देशित केलेली रक्कम_______________ ह्यांना (हस्तांतरित झालेल्याचे नाव) किंवा त्याच्या आदेशितीला देण्यात यावी.

करिता आणि च्या वतीने

---

(हस्तांतरकर्त्यांचे नाव)

---

१. ‘

२. ‘

३. ‘

४. ‘

५ .‘

६. ‘

७. ‘

८. ‘

**शेड्युल II**
(परिच्छेद १४ पहा)

**आयपीए प्रमाणपत्र**

आम्ही, ______________________________ ह्यांचेबरोबर (देणारी संस्था/कंपनीचे नाव) वैध करारनामा केला आहे.

२. आम्ही सर्व कागदपत्रे, उदा. मंडळाचा ठराव, आणि______________________________ (कंपनी/संस्थेचे नाव)

ह्यांनी दिलेले क्रेडिट रेटिंग कंपनीचे प्रमाणपत्र पडताळून पाहिली आहेत. आणि प्रमाणित करतो की ते कागदपत्र व्यवस्थित आहेत. मूळ कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती आमच्या ताब्यात ठेवल्या आहेत.

३.* आम्ही असेही प्रमाणित करतो की, अनुक्रमांक ______________ दिनांक ______________ व रु .______________ (रुपये ______________________________)साठी असलेल्या, सोबत जोडलेल्या कमर्शियल पेपरमधील एक्सिक्युटंट्सच्या सह्या,. ______________ ह्यांनी (देणाऱ्या कंपनी/संस्थाचे नाव) आम्हाला सादर केलेल्या नमुना सह्यांशी जुळणाऱ्या आहेत.

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता/स्वाक्षरीकर्ते
(देणाऱ्या व प्रदान करणाऱ्या एजंटचे नाव)

जागाः

दिनांक :

* (प्रत्यक्ष स्वरुपातील सीपीसाठी लागु)

**महापरिपत्रक- वाणिज्यिय**
**कागदपत्र देण्यासाठी**
**मार्गदर्शक सूचना - जुलै १,२०११**

**शेड्युल III**
(परिच्छेद १५ (ब)(४) पहा)

**कमर्शियल पेपर देणाराने सादर करावयाच्या माहितीचा नमुना**

(सीपीचे प्रचालन पूर्ण झाल्याच्या ३ दिवसांच्या आत, इश्युईंग अँड पेईंग एजंटमार्फत, जीजीएम, एफएमडी आरबीआय मुंबई त्यांचेकडे सादर केला जावा).

प्रतिः

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक
वित्तसहाय्य बाजार विभाग खाते
भारतीय रिझर्व बँक
केंद्रीय कार्यालय, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

मार्फत (आयपीएचे नाव)

महोदय,

**कमर्शियल पेपर देणे**

रिझर्व बँकेने ऑगस्ट १९ २००३ रोजी दिलेल्या, कमर्शियल पेपर देण्याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, खाली तपशीलानुसार आम्ही कमर्शियल पेपर दिला आहे :

i) देणाराचे नाव : :
ii) पंजीकृत कार्यालय व पत्ता : :
iii) व्यवहाराचे स्वरुप : :
iv)

iv) देणाराचे शेअर्स नोंदणीकृत झाले असलेले स्टॉक एक्सचेंज (लागु असल्यास) :

v) अगदी अलिकडील ताळेबंदानुसार नक्त मूर्त मूल्य (नेट टँजिबल वय) :

vi) एकूण कार्यकारी भांडवल मर्यादा (लागु असल्यास) :

vii) थकित बँक कर्जे :

(अ) दिलेल्या कमर्शियल पेपरचा तपशील : ची ची

viii) (दर्शीनी मूल्य) इश्यु मॅच्युरिटीची तारीख तारीख तारीख रक्कम दर

इश्यु मॅच्युरिटी

i)

ii)

(ब) विद्यमान इश्युसह आउटस्टँडिंग सीपीची (दर्शनी मूल्य) रक्कम :

ix) रिझर्व बँकेने विहित केलेल्या क्रेडिट रेटिंग एजन्सीने दिलेले रेटिंग्ज

i)

ii)

x) सीपी इश्युच्या बाबतीत स्टँडबाय सुविधा पुरविण्यात आली आहे काय?

xi) होय असल्यास

i) रु. कोटींमधील स्टँडबाय सुविधेची रक्कम

ii) उपलब्ध करणार (बँक/एफआयचे नाव)

xii) सीपी इश्युच्या विनाअट व न फिरविता येणारी हमी दिली आहे काय?

:

xiii) होय असल्यास

i) हमीची रक्कम रु. कोटी :

ii) हमी देणार(बँक/हमीदाराचे नाव) :

हमीदाराचे क्रेडिट रेटिंग :

करिता आणि च्या वतीने

____________________

(देणाराचे नाव)





**जोडपत्र १**
(परिच्छेद १७ पहा)

**सीपीच्या परतफेडीबाबतच्या कर्सुरींची सविस्तार माहिती**

| देणाराचे नाव | सीपी इश्यु करण्याची तारीख | रक्कम | रक्कम परत करण्याची ड्युडेट | सुरुवातीचे रेटिंग | आता चे रेटिंग | ह्या सीपी प्रचालनाला स्टँडबाय सहाय्य/क्रेडिट बँक स्टॉप सुविधा/हमी दिली गेली होती काय ? | तसे असल्यास, वरील स्तंभ (७) मधील सुविधा पुरविणाऱ्या संस्थेचे नाव. | वरील स्तंभ (७) मधील सुविधाचा मान राखून प्रदान केले गेले काय. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**जोडपत्रII**

**व्याख्या**

अन्य संदर्भ नसल्यास ह्या मार्गदर्शक तत्वांमध्येः

अ) 'बँक' किंवा 'बँकिंग कंपनी' म्हणजे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा१०) च्या कलम ५ च्या खंड (सी) मध्ये व्याख्या केलेली बँकिंग कंपनी किंवा त्याच्या खंड (डीए) , खंड (एनसी) आणि खंड (एनडी) मध्ये अनुक्रमे, 'कॉरेस्पाँडिंग न्यू बँक', 'भारतीय स्टेट बँक' किंवा 'सहाय्यक/दुय्यम बँक' आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम ५६ सह वाचित, कलम ५ च्या खंड (सीसीआय) मध्ये व्याख्या केलेली 'सहकारी बँक' ही समाविष्ट आहे.

ब) 'अनुसूचित बँक' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या दुसऱ्या शेड्युलमध्ये समाविष्ट असलेली बँक.

क) 'अखिल भारतीय वित्तीय संस्था (एफआय)' म्हणजे, ह्या महापरिपत्रकाच्या परिच्छेद ६.२ मध्ये विहित केलेल्या अंब्रेल लिमिटमध्ये, लागु असेल त्याप्रमाणे, टर्म मनी, मुदत ठेवी, ठेवीप्रमाणपत्रे, कमर्शियल पेपर, आणि आंतरकॉर्पोरेट ठेवींच्या माध्यमातून स्त्रोत उभे करण्यास, रिझर्व बँकेने खास परवानगी दिलेल्या वित्तीय संस्था.

(ड) 'प्राथमिक डीलर' म्हणजे, वेळोवेळी सुधारित 'सरकारी सिक्युरिटी बाजारातील प्राथमिक डीलर्ससाठी असलेली मार्गदर्शक तत्वे' दि. मार्च २९, १९९५ अनुसार, एक प्राथमिक डीलर म्हणून प्राधिकरणपत्र मिळविली असलेली एक अबँकीय वित्तीय कंपनी.

ई) 'कॉर्पोरेट' किंवा 'कंपनी' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या ४५ आय (एए) मध्ये व्याख्या केलेली कंपनी परंतु सध्या जारी असलेल्या कोणत्याही कायद्याखाली गुंडाळल्या जात असलेल्या कंपनीचा ह्यात समावेश नाही.

फ) 'अबँकीय कंपनी' म्हणाजे, बँकिंग कंपनी सोडून अन्य कंपनी.

ग) 'अबँकीय वित्तीय कंपनी' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४५ आय(एफ मध्ये व्याख्या केलेली कंपनी.

(ह) "कार्यकारी भांडवल मर्यादा" म्हणजे, कार्यकारी भांडवलाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी, एक किंवा अधिक बँका/वित्तसंस्थानी, खरेदी, डिस्काउंटसह असलेल्या एकूण मर्यादा

(आय) 'मूर्त निव्वळ मूल्य' म्हणजे, भरणा झालेले भांडवल, अधिक त्या कंपनीच्या अगदी अलिकडील ताळेबंदानुसार, मुक्त राखीनिधी (ह्यात शेअर प्रिमियम अकाउंट, भांडवल व रोख्यांची विमोचन रक्कम आणि भविष्यातील एखादे दायित्व परत करण्यासाठी किंवा ॲसेट्सच्या मूल्य-ऱ्हासासाठी किंवा बुडित कर्जासाठी किंवा ॲसेट्सचे पुनर्मूल्यांकन करुन निर्माण केलेला राखीव निधी समाविष्ट आहे), वजा संचायित तोटा, डिफर्ड रेव्हेन्यु खर्चाचा शेष व इतर मूर्त ॲसेट्स.

(जे) येथे वापरण्यात आलेले आणि भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दसमूह ह्यांचा अर्थ, त्यांना ह्या अधिनियमात दिल्या गेलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

महापरिपत्रक  - वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदशके -जुलै १,२०१

**एकत्रित केलेल्या अधिसूचना परिपत्रकांची यादी**

| अनु. क्र | क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | आयईसीडी.क्र.पीएमडी.१५/८७ (सीपी)-८९/९० | जानेवारी ३,१९९० | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी (सीपी) |
| २. | आयईसीडी.क्र.पीएमडी.१९/८७ (सीपी)-८९/९० | जानेवारी २३,१९९० | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी (सीपी) |
| ३. | आयईसीडी.क्र.पीएमडी.२८/८७ (सीपी)-८९/९० | एप्रिल२४,१९९० | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |
| ४. | आयईसीडी.क्र .पीएमडी.१/०८.१५.०१/९३-९४ | जुलै २,१९९० | फॅक्टोरिंग सर्व्हिसेसच्या प्रोविजनसाठी मार्गदर्शके |
| ५. | आयईसीडी.क्र.पीएमडी.२/८७ (सीपी)-९०/९१ | जुलै ७,१९९० | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - विद्यमान इश्युचे नुतनीकरण |
| ६. | आयईसीडी.क्र .पीएमडी.५७/८७ (सीपी)-९०/९१ | मे ३०,१९९१ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |
| ७. | आयईसीडी.क्र .१६/पीएमडी/८७ (सीपी)-९१/९२ | ऑगस्ट २०, १९९१ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी (सीपी) |
| ८. | आयईसीडी.क्र .३९/पीएमडी/८७ (सीपी)-९१/९२ | डिसेंबर २०, १९९१ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |
| ९. | आयईसीडी.क्र .४९/सीसीआणिएमआयएस/८७/९१-९२ | फेब्रुवारी ७, १९९२ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी (सीपी) - रिटन्सचे सबमिशन इत्यादी. |
| १०. | आयईसीडी.क्र .६३/०८.१५.०१/९१-९२ | मे १३,१९९२ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |
| ११. | आयईसीडी.क्र .३४/०८.१५.०१/९२-९३ | मे १९,१९९३ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) —स्टँप ड्युटीचा विनंती अर्ज |
| १२. | आयईसीडी.क्र .१३/०८.१५.०१/९३-९४ | ऑक्टोबर ५, १९९३ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |
| १३. | आयईसीडी.क्र .१७/०८.१५.०१/९३-९४ | ऑक्टोबर १८, १९९३ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | आयईसीडी.क्र .२५/०८.१५.०१/९३-९४ | डिसेंबर १७, १९९३ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी (सीपी) |
| १५. | आयईसीडी.क्र .१९/०८.१५.०१/९४-९५ | ऑक्टोबर २०, १९९४ | वाणिज्य कागदपत्र - स्टँड बाय व्यवस्था |
| १६. | आयईसीडी.क्र .२८/०८.१५.०१/९५-९६ | जुन २०, १९९६ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) |
| १७ | आयईसीडी.क्र .३/०८.१५.०१/९६-९७ | जुलै २५, १९९६ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) - सूचनांमधील दुरुस्त्या |
| १८. | आयईसीडी.क्र .१४/०८.१५.०१/९६-९७ | नोव्हेंबर ५, १९९६ | वाणिज्य कागदपत्र |
| १९. | आयईसीडी.क्र .२५/०८.१५.०१/९६-९७ | एप्रिल१५, १९९७ | वाणिज्य कागदपत्र |
| २०. | आयईसीडी.क्र .१४/०८.१५.०१/९७-९८ | ऑक्टोबर २७, १९९७ | वाणिज्य कागदपत्र |
| २१. | आयईसीडी.क्र .४३/०८.१५.०१/९७-९८ | मे २५, १९९८ | वाणिज्य कागदपत्र |
| २२. | एमपीडी.४८/०७.०१.२७९/२०००-०१ | जुलै ६, २००० | वाणिज्यिय कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| २३. | आयईसीडी. क्र . १५/०८.१५.०१/२०००-०१ | एप्रिल ३०, २००१ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| २४. | आयईसीडी.क्र .२/०८.१५.०१/२००१-०२ | जुलै २३, २००१ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| २५. | आयईसीडी.क्र .११/०८.१५.०१/२००२-०३ | नोव्हेंबर १२, २००२ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| २६. | आयईसीडी. क्र . १९/०८.१५.०१/२००२-०३ | एप्रिल ३०, २००३ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| २७ | आयईसीडी. क्र . /०८.१५.०१/२००३-०४ | ऑगस्ट १९, २००३ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी - वाणिज्य कागदपत्र बाजारपेठेतील कसूर |
| २८ | एमपीडी. ब्री . २५१/०७.०१.२७९/२००४-०५ | जुलै १, २००४ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| २९ | एमपीडी. ब्री . २५८/०७.०१.२७९/२००४-०५ | ऑक्टोबर २६, २००४ | वाणिज्य कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शके |
| ३० | एमपीडी. ब्री . २६१/०७.०१.२७९/२००४-०५ | एप्रिल १३, २००५ | वाणिज्य कागदपत्र (सीपी) अहवाल सादर करणे - एनडीएस प्लॅटफॉर्मवर देणे |
| ३१ | एफएमडी.क्र.२१५३/०२.०२.०१०/ २००९-१० | मार्च ५, २०१० | वाणिज्य कागदपत्र देण्याचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अहवाल सादर करणे - ऑनलाईन रिटर्न्स फाईलिंग प्रणाली |
| ३२ | आयडीएमडी.डीओडी.११/११.०८.३६/२००९-१० | जून ३०, २०१० | सर्टिफिकेटस ऑफ डिपॉझिट (सीडीज्) मध्ये ओटीसी व्यवहारचा अहवाल सादर करणे आणि<br>वाणिज्य कागदपत्रे (सीपीज्) |